सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले ▲ अंक : १५ ▲ मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर २०२५ ▲ पाने : ४ ▲ अमळनेर ▲ किंमत : १ रु. Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

०७ ऑक्टोबर

- पुण्यात विदेशी कपड्यांची होळी झाली. परदेशी मालावर बहिष्कार टाकण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता.
- महात्मा गांधींनी 'नवजीवन' हे वृत्तपत्र सुरू केले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# अमळनेर तालुक्यातील अनेक शाळांमध्ये सीसीटीव्ही व तक्रारपेट्याच नाहीत

## स्वच्छतागृहांची अवस्था तर छी...! छी...!! छी...!!!




ग्लोबल महातेज वृत्तसेवा

रजनीकांत पाटील

अमळनेर : तालुक्यातील खास करून जिल्हा परिषदेच्या व काही खासगीही शाळांना शाळा म्हणावे, की नाही अशी स्थिती आहे. बहुतांश शाळांमध्ये सीसीटीव्ही आणि तक्रारपेट्या नाहीत. काही शाळांमध्ये सीसीटीव्ही आहेत. मात्र, ते केवळ नावाला आहेत. स्वच्छतागृहांची अवस्था तर इतकी वाईट आहे, की त्यांना स्वच्छतागृहांऐवजी अस्वच्छतागृहे म्हणणे अधिक योग्य होईल.

तालुक्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांमधील खास करून मुलींची सुरक्षा आणि सार्वजनिक स्वच्छतेची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. मात्र, संबंधितांना त्याचे फारसे काही सोयरसुतक जाणवत नाही. शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याच्या सक्त सूचना आहेत. मात्र, शिक्षण विभागाच्या अनेक महत्त्वाच्या समस्यांना ज्याप्रमाणे अनेक शाळांमध्ये कचऱ्याची टोपली दाखविली जाते त्याचप्रमाणे सीसीटीव्हीबाबतच्या सूचनेचेही झाले आहे. अनेक शाळांमध्ये सीसीटीव्हीच नाहीत. काही ठिकाणी नावाला सीसीटीव्ही आहेत. मात्र, ते कार्यरत नाहीत. तक्रारपेट्या तर सहसा कुठे दिसतच नाहीत. दिवसेंदिवस अल्पवयीन विद्यार्थ्यांवरील अत्याचार व गैरप्रकाराच्या घटना वाढत आहेत. त्यांना प्रतिबंध करण्यासाठी शिक्षण विभागाने सीसीटीव्ही सक्तीचे केले आहेत. विद्यार्थ्यांसाठी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र व सुरक्षित स्वच्छतागृहे असावीत, अशाही सूचना आहेत. मात्र प्रत्यक्षात असे छायाचित्र दुर्मिळ होत चालले आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थी व विद्यार्थिनी थेट उघड्यावरच नैसर्गिक विधी करतात. त्यातूनच अत्याचारासारख्या घटना जन्माला येतात.

### स्वच्छतागृहांची अवस्था दयनीय

काही ठिकाणी स्वच्छतागृहे पडक्या स्वरूपात व अत्यंत अस्वच्छ आहेत. त्यांच्यापासून दहा मीटर अंतरावरही उभे राहणे कठीण असते. इतकी दुर्गंधी त्यात असते. खास करून विद्यार्थिनी लज्जा रक्षणासाठी अशा अत्यंत घाणेरड्या स्वच्छतागृहांचा नाईलाजास्तव वापर करतात. शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत शाळांमध्ये स्वच्छतेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करण्यात येतो, असे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात तसे चित्र क्वचितच दिसते. अनेक पालक समित्या व ग्रामपंचायतींकडूनही याकडे दुर्लक्ष होत चालल्याचे चित्र आहे.

### अनेक शाळा सीसीटीव्ही कॅमेऱ्यांविनाच!

अमळनेर तालुक्यात २६२ पैकी १३३ शाळा जिल्हा परिषदेच्या आहेत. त्यातील फक्त ६ शाळांमध्ये सीसीटीव्ही आहेत. पालिकेच्या ६ शाळा आहेत. मात्र, त्यातील एकाही शाळेत सीसीटीव्ही नाहीत. ४३ खासगी प्राथमिक शाळा आहेत. त्यातील २८ शाळांमध्ये सीसीटीव्ही आहेत. ८१ माध्यमिक शाळा आहेत. त्यातील ४२ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. शासनाने शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसोबतच सती सावित्री समिती, तक्रारपेटी, विद्यार्थी सुरक्षा समिती कार्यान्वित निर्देश दिल आहेत. मात्र, या निर्देशांची फारच कमी ठिकाणी काटेकोर अंमलबजावणी होते. अनेक शाळांतील विद्यार्थिनींना गुड टच व बॅड टचबाबत माहिती नसल्याचेही निदर्शनास आले आहे. खरेतर गुड टच व बॅड टचबाबतची माहिती विद्यार्थिनींना देणे सक्तीचे आहे.

शाळा खासगी असोत की जिल्हा परिषदेच्या त्या सर्वांना विद्यामंदिर म्हटले जाते. मात्र, अनेक शाळांमध्ये विद्यामंदिर या शब्दाचा घोर अपमान व उपेक्षा होत असल्याचे दिसते आहे. याबाबत लोकप्रतिनिधी व शासनासह पालक व ग्रामस्थ यांनीही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा अप्रिय व अघटित घटना दुर्दैवाने घडतच राहतील.

# अमेझॉन, फ्लिपकार्टसारख्या कंपन्यांचा 'सीओडी' आडून वेगळाच डाव?

## सरकारला संशय, चौकशी सुरू

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : ई-कॉमर्स कंपन्यांकडून कॅश ऑन डिलेव्हरीसाठी अतिरिक्त शुल्क घेतले जात आहे. यासंबंधींच्या तक्रारी केंद्र सरकारला प्राप्त झाल्या असून सरकारला संशय असल्याने याबद्दल चौकशी करत आहे.

केंद्र सरकार आता ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट यासारख्या ऑनलाईन डिलिव्हरी कंपन्याची चौकशी करत आहे. ही चौकशी कॅश ऑन डिलिव्हरी (सीओडी) लावण्यात आलेल्या अतिरिक्त फी बद्दल आहे. या कंपन्या ग्राहकांना अगोदर पेमेंट करण्यास भाग पाडत आहे. जर प्रीपेड ऑर्डर कॅन्सल झाल्यास रिफंडमध्ये विलंब किंवा व्यत्यत का येतो ? ग्राहक व्यवहार मंत्रालय या तक्रारींचा आढावा घेत आहे. लवकरच ई-कॉमर्स कंपन्या, ग्राहक अधिकार संघटना आणि उद्योग समुहांशी चर्चा होणार आहे. ज्यातून कंपन्यांचा गरजा आणि ग्राहकांची सुरक्षिततेचा समतोल साधणारा उपाय शोधला जाईल.

प्रीपेड पेमेंट करण्यासाठी दबाव

मिंटच्या सूत्राने माहिती दिली, की हे प्लॅटफॉर्म सीओडीवर शुल्क आकारुन ग्राहकांवर प्रीपेड पेमेंट करण्यासाठी दबाव आणत आहेत. जे ग्राहकांच्या अधिकाराच्या विरोधात आहे. मंत्रालय या प्रकरणी तपास करत आहे. ई कॉमर्सचे लोक सांगतात, की छोटे शुल्क वारंवार ऑर्डर कॅन्सल होण्यापासून थांबवण्याकरिता आहे. त्याच्यामुळे इन्वेंटरी आणि लॉजिस्टिकचे नियोजन बिघडते. ग्राहकांच्या संघटना सांगतात की, शुल्क आणि डिलिव्हरीमधील विलंब ग्राहकांची चिंता वाढवत आहे. ग्राहकांना वाटत, की त्यांचे पैसे अडकले आहेत आणि कंपन्या त्यावर व्याज कमवत आहे. सरकारने यावर कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# बोरी पुलावरील खड्ड्यांवर बांधकाम विभागाची पुन्हा मलमपट्टी

ग्लोबाल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : बोरी नदी पात्रावरील पुलावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारक त्रस्त आहेत. शहरातील वर्दळीचा रस्ता असून दिवसभरातून या ठिकाणी अनेक लहान-मोठे अपघात घडत असल्याने याबाबत दै. ग्लोबल महातेजने बातमी प्रसिद्ध केल्यानंतर बांधकाम विभागाने बातमीची दखल घेत तातडीने खड्डे बुजवण्याचे काम सुरू केले. मात्र, ही पुन्हा तात्पुरती मलमपट्टीच केली आहे.

बांधकाम विभागाने कामगारांचा आठ ते दहा जणांचा ताफा पुलावर दाखल झाला. रस्त्याची झाड झुड करत डांबर तापविण्याची तयारी करण्यात आली. मात्र, हे सर्व केवळ "नावापुरते"च ठरले. पुलावरील खड्ड्यांवर केवळ मलमपट्टी करून विभागाने वेळ मारून नेली आहे. आपले कर्तव्य केले. केवळ एका दिवसातच या पुलावरील खड्ड्याची पूर्वीचीच अवस्था झाली. बुजवलेल्या ठिकाणांवरून आता बारीक खडी बाहेर पडू लागली आहे. परिणामी दुचाकीस्वार घसरत आहेत.

तोल सांभाळणे कठीण होत असून, पुन्हा अपघात वाढले आहेत. वाहनधारकांनी याविषयी नाराजी व्यक्त केली आहे. काम सुरू केले तरी दर्जेदार पद्धतीने करावे. फक्त वरून डांबर टाकल्याने प्रश्न सुटणार नाही. दररोज अनेक लोक या पुलावरून प्रवास करतात. प्रशासनाने योग्य दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### एखादा मोठा पुढारी किंवा अधिकारी घसरून पडावा

या पूलावरून रोजे मोटारसायकलने सर्व प्रकारची कसरत करून जीवाच्याआकांताने ये- जा करणारे रमेश मोरे यांनी सांगितले, की या पूलावरून मोटारसायकलने एखादा मोठा पुढारी किंवा अधिधकारी जोरात घसरून पडावा. तो वेदनांनी विव्हळेल तेव्हाच त्यांना सामान्य जनतेच्या वेदना कळतील.

# चांगले व्यक्तिमत्त्व घडविणे संघाचा केंद्रबिंदू

## डॉ. विक्रांत पाटील; शताब्दी वर्षानिमित्त अमळनेरला कार्यक्रम

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. हे केवळ एक शताब्दी नव्हे तर राष्ट्रनिर्मितीचा आत्मसाक्षात्कार आहे. अखंड सेवाभावनेचा हा महायोग आहे. देश उभारणीत चांगले व्यक्तीमत्व घडविणे हा संघाचा केंद्रबिंदू राहिला आहे, असे प्रतिपादन हृदयरोगतज्ज्ञ डॉ. विक्रांत पाटील यांनी केले.

येथील संत सखाराम महाराज नगरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त झालेल्या कार्यक्रमप्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. याप्रसंगी देवगिरी प्रांतसंघ चालक अनिल भालेराव, नगर कार्यवाह देवेंद्र तायडे आदी उपस्थित होते.

डॉ. पाटील पुढे म्हणाले, की देशभक्ती, निष्काम सेवा, फाळणीच्या वेदना, नैसर्गिक आपत्ती, कोरोना महासंकट अशा प्रत्येक संकट काळात संघ स्वयंसेवक सर्वप्रथम धावून गेले. प्रांत संघचालक भालेराव म्हणाले, की कलकत्त्यात वैद्यकीय शिक्षण घेत असताना डॉ. हेडगेवार क्रांतिकारक अनुशीलन समितीशी जोडले गेले. शाखेतील एक तास व्यक्तीला अनुशासन, संघभावना आणि राष्ट्रभक्ती शिकवतो. संघाने गृह संपर्क, विजयादशमी उत्सव, हिंदू युवा सामाजिक सद्भाव, प्रबुद्ध नागरिक संमेलन, वस्तीनिहाय शाखा सप्ताह आणि पंचपरिवर्तन या सात उपक्रमांवर विशेष भर दिला आहे. दरम्यान, शस्त्रपूजन व स्वयंसेवकांनी सादर केलेल्या घोष प्रात्यक्षिकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. लोकेश महाजन यांनी सांघिक गीत, स्वप्निल कुलकर्णी यांनी अमृत वचन, विजय पाटील यांनी वैयक्तिक गीत सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व स्वयंसेवकांनी देश परमवैभवाला नेण्यासाठी कटिबद्ध राहण्याची शपथ घेतली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. प्रमोद पवार यांनी प्रस्ताविक केले.



# कोजागरीच्या प्रकाशात हिरकणीच्या आठवणी मात्र अंधारात...!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिरकणी नावाची गवळण सायंकाळी रायगडावर दूध पोहोचविण्यासाठी गेलेली. काम करता-करता उशीर झालेला त्या माऊलीला कळलेच नाही.
महाराजांचे सक्त आदेश होते, की सायंकाळी गडाचे दरवाजे बंद झालेच पाहिजेत. कुणाचीही गय नाही. तसे दरवाजे बंद करण्यात आले. हिरकणीने भरपूर विनवणी केली. पण सेवेकऱ्यांनी दरवाजा परत उघडण्यास स्पष्ट नकार दिला. हिरकणीला गडाखाली जाता येईना. तिचे तान्हुले बाळ गडाखाली तिच्या घरी होते. घरी जाऊन त्या तान्हुल्याला दूध पाजायचे होते. त्या माऊलीची प्रचंड घालमेल झालेली होती. अखेर मागचा-पुढचा कुठलाही विचार न करता हिरकणी गडाच्या मागच्या बाजूने (अत्यंत अवघड कड जिथून शत्रूलाही यायला मार्ग नव्हता) अतिशय अवघड वाटेने एकटी खाली उतरली व घरी जाऊन बाळाला घेतले. तेव्हा कुठे तिचा जीव शांत झाला. दुसऱ्या दिवशी शिवरायांना ही गोष्ट कळताच राजांनी हिरकणीचा सन्मान केला. तिच्या सन्मानार्थ रायगडावरचा एक कडा हिरकणी बुरुज म्हणून ओळखला जाऊ लागला. हा सन्मान होता तिच्या मातृत्वाचा आणि धैर्याचा. हिरकणी म्हणजे मातृत्वाचे अन् धाडसाचे प्रतीक. अशा अनेक हिरकण्या आजही खेडोपाडी-गावोगावी आपापली लढाई लढतायत... सलाम या सगळ्या हिरकरण्यांना...!

# रेल्वेतील बेडशीट, उशी चोरली तर दंडासह पाच वर्षांचा कारावास!

## अमळनेर रेल्वे स्थानकावर गाड्यांमध्ये जनजागृती

ग्लोबाल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : रेल्वे प्रवास हा सर्वात सुखकर प्रवास मानला जातो. यामुळे रोज मोठ्या संख्येने नागरिक यातून प्रवास करतात. अनेकदा रेल्वेच्या एसी कोचला पसंती दिली जाते. एसी कोचमध्ये प्रवाशांना थंडी वाजू नये म्हणून त्यांच्या सोयीसाठी चादर, सीटवर बेडशीट व उशी असते. मात्र, बऱ्याचवेळा या उशी व चादरी चोरीला जातात. चोरी करताना प्रवासी आढळल्यास त्याला दंडासह पाच वर्षे शिक्षेची तरतूद आहे. याबाबत रेल्वे स्थानकांवर जनजजागृती सुरू आहे.

प्रवाशांना या सुविधांचा लाभ होतो. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रवाशांना हे उपयुक्त ठरते. काही प्रवासी मिळालेल्या सुविधेचा गैरफायदा घेतात. एसी कोचने प्रवास केल्यानंतर तिथे असलेली चादर व उशी घरी घेऊन जाण्याच्या बेतात असतात. अनेक वेळा अशा बघण्यास मिळतात. मात्र, तसे केल्यास प्रवाशांना शिक्षाही मिळते. संबंधित प्रवाशाला या कृत्यामुळे जेलची हवाही खावी लागते व दंडही भरावा लागतो.

या चोरीच्या घटनांबाबत अमळनेर रेल्वे स्थानकात चौकशी केली असता अमळनेर रेल्वे स्थानकावरवरुन येणाऱ्या व जाणाऱ्या गाड्यांचे एसी कोच तपासले जातात. रेल्वेची मालमत्ता असल्याने कोणी नुकसान केले अथवा चोरीस नेले ही खात्री होत असते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### काय आहे शिक्षा?

रेल्वेच्या एसी कोचमधील चादर किंवा उशी चोरी केली आणि पकडला गेला तर रेल्वे संपत्ती अधिनियम १९६६ अंतर्गत कारवाई होते. प्रवासी असे करताना पकडला गेल्यास १ हजार रुपये दंड भरावा लागतो. चोरी करणाऱ्या प्रवाशांने दुसऱ्या वेळेसही अशी हरकत केल्यास २ हजार रुपये व दोन वर्षे कारावास होतो. प्रकरण जास्तच गंभीर झाल्यास ५ वर्षांच्या कारावासाची शिक्षेची तरतूद आहे. दरम्यान, प्रवाशांनी व अन्य लोकांनी केलेल्या चोऱ्यांमुळे सुरत मंडळाला लाखो रुपयांचा फटका बसला आहे, असे एका रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले.





# अक्षयच्या ‘ छावा ’ मधील क्रूर औरंगजेबनंतर आता महाकालीतील शुक्राचार्यांच्या भूमिकेने सारे चकित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



बॉलिवूडमधील अष्टपैलू अभिनेत्यांपैकी एक म्हणजे अक्षय खन्ना. त्याने आतापर्यंत मोजकेच पण सुपरहीट चित्रपट दिले आहेत. त्याच्या अभिनयाची ताकद चाहत्यांना चांगल्या प्रकारे परिचित आहे. अलीकडेच ‘ छावा ’ चित्रपटात त्याने साकारलेल्या क्रूर मुघल शासक ‘ औरंगजेब ’च्या भूमिकेने प्रेक्षकांना थक्क केले. या खलनायकी भूमिकेने अक्षयच्या अभिनयाची खरी ताकद दाखविली. काही प्रेक्षकांनी त्याच्या पात्राला प्रत्यक्ष समजून तिरस्कार व्यक्त केला. ती खरेतर त्याच्या अभिनयाचीच पावती आहे. आता अक्षय पुन्हा एकदा प्रेक्षकांना आश्चर्यचकित करण्यासाठी सज्ज आहे ते म्हणजे ‘ असुरगुरू शुक्राचार्य ’च्या भूमिकेत.

**‘ महाकाली ’ चित्रपटात अनोखा लूक**

प्रशांत वर्मा आणि आरकेडी स्टुडिओच्या आगामी तेलुगू चित्रपट ‘ महाकाली ’मधून अक्षय खन्ना शुक्राचार्यांच्या पौराणिक भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटातील त्याच्या पहिल्या लूकने सर्वांचे लक्ष वेधले आहे. लांब करडी दाढी, भाळी भस्माचा टिळा, भेदक नजर आणि चेहऱ्यावरील धीरगंभीर भाव यामुळे अक्षयला ओळखणेही कठीण झाले आहे. हिंदू पुराणांमध्ये असुरांचे गुरू आणि संजीवनी विद्येचे ज्ञाता म्हणून प्रसिद्ध असलेल्या शुक्राचार्यांच्या या रूपाला अक्षयने जीवंत केले आहे. चाहत्यांनी या लूकला उदंड प्रतिसाद देत संपूर्ण भूमिका पाहण्याची उत्सुकता व्यक्त केली आहे.

**‘ महाकाली ’बद्दल थोडक्यात**

‘ महाकाली ’ हा प्रशांत वर्मा सिनेमॅटिक युनिव्हर्सचा भाग आहे. देवी कालीवर केंद्रित हा चित्रपट स्त्रीशक्ती आणि सक्षमीकरणाचे प्रतीक म्हणून सादर होणार आहे. अक्षय खन्नाचे तेलुगू चित्रपटसृष्टीतील हे पदार्पण प्रेक्षकांचे किती मन जिंकेल, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

**शुक्राचार्य कोण आहेत? :** हिंदू पुराणानुसार शुक्राचार्य हे असुरांचे (दानवांचे) गुरू आणि शुक्र ग्रहाचे अधिष्ठाता आहेत. संजीवनी विद्या आणि इतर शक्तींचे ज्ञाता असलेले शुक्राचार्य पौराणिक कथांमध्ये मार्गदर्शक आणि रणनीतीकार म्हणून ओळखले जातात.

# हिंदू असूनही असे नाव का? काय आहे? वॉशिंग्टन सुंदरच्या नावामागचा किस्सा...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय क्रिकेटमधील नवे चेहरे, नव्या कहाण्या नेहमीच लोकांना आकर्षित करतात. आज भारतीय संघातील डावखुरा ऑलराउंडर वॉशिंग्टन सुंदर चर्चेत आहे. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत त्याने आपली फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही आघाड्यांवर दमदार छाप टाकली आहे. पण सुंदरच्या नावाने अनेकदा चाहत्यांना गोंधळात टाकले आहे. हिंदू कुटुंबात जन्मलेला असूनही त्याचे नाव ‘ वॉशिंगटन ’ का? यामागे नेमकी काय कहाणी आहे?

## वडिलांचे अपूर्ण स्वप्न

वॉशिंग्टन सुंदरचे वडील एम. सुंदर हे स्वतःही चांगले क्रिकेटपटू होते. पण तमिळनाडूच्या मुख्य संघात त्यांना कधी स्थान मिळाले नाही. त्यांच्या कारकीर्दीला फार मोठे यश लाभले नाही. क्रिकेटबद्दलची आवड आणि मेहनत मात्र त्यांनी कधीच कमी केली नाही. लहानपणी क्रिकेट खेळताना त्यांना एका खास व्यक्तीचा आधार मिळाला. त्यामुळे त्यांचे आयुष्यच बदलले.

## निवृत्त आर्मी ऑफिसरचा आधार

एम. सुंदर ज्या स्टेडियमवर सरावासाठी जात असत तेथे एक निवृत्त आर्मी ऑफिसर नेहमी येत असे. तो मुले खेळताना पाहत असे. त्यात एम. सुंदरची प्रतिभा त्याला भावली. वॉशिंग्टन सुंदर गरीब कुटुंबातून आलेला असल्याने किट्स, शाळेचा खर्च, खेळावरील खर्च त्याच्यासाठी खूप अवघड होते. त्या ऑफिसरने वॉशिंग्टन सुंदरला मदतीचा हात दिला. त्याने वॉशिंग्टन सुंदरला किट दिले. शाळेत सोडणे-आणणे स्वतःच्या सायकलवरून केले आणि शिक्षणातही मदत केली. एका गरीब मुलाला खेळाडू बनविण्यासाठी केलेला हा प्रयत्न एम. सुंदरसाठी आयुष्यभर विसरण्यासारखा नव्हता.

## नावामागची प्रेरणा

या उदार मनाच्या ऑफिसरचे नाव होते पी. डी. वॉशिंग्टन. १९९९ मध्ये त्यांचे निधन झाले. त्याच वर्षी एम. सुंदर यांच्या घरी मुलगा जन्माला आला. सुरूवातीला त्यांनी मुलाचे नाव ‘ श्रीनिवासन ’ ठेवले. पण लगेचच त्यांना वाटले, की ज्या व्यक्तीने आपल्या गरिबीच्या काळात साथ दिली त्याचे ऋण फेडण्याचा हा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या मुलाचे नाव ठेवले वॉशिंगटन सुंदर. हे नाव केवळ मुलाची ओळख बनले नाही, तर कृतज्ञतेचे प्रतीक ठरले आहे.

## नावामागची भावना

आज जेव्हा वॉशिंगटन सुंदर भारतीय संघासाठी खेळतो तेव्हा चाहत्यांना त्याचे नाव वेगळे वाटते. काहींना ते ख्रिश्चन शैलीचे वाटते, काहींना परदेशी. पण प्रत्यक्षात त्यामागे आहे एक संवेदनशील आणि प्रेरणादायी कहाणी. वडिलांच्या आयुष्यात ज्यांनी निःस्वार्थपणे आधार दिला त्यांची आठवण म्हणून मुलाला दिलेले हे नाव आहे.



**खेळासोबत कृतज्ञतेची कहाणी**

वॉशिंग्टन सुंदरच्या नावामागची ही कहाणी सांगते, की एखादे नाव हे फक्त ओळख नाही, तर त्यामध्ये इतिहास, त्याग आणि ऋण फेडण्याची भावना दडलेली असते. एका आर्मी ऑफिसरच्या मदतीमुळे सुरू झालेली कहाणी आज भारतीय संघातील या तरुण ऑलराउंडरपर्यंत पोहोचली आहे. आज वॉशिंगटन सुंदर जेव्हा मैदानावर बॅट फिरवतो किंवा फिरकी टाकतो, तेव्हा त्याच्या नावामागची ही कृतज्ञतेची कथा त्याला आणखी खास बनवते, हे विशेष...!

## सक्सेस स्टोरी

# गृहिणी ते आंतरराष्ट्रीय बॉडीबिल्डर : किरण देबल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

किरण देबला या हैदराबादच्या सामान्य गृहिणीने स्वतःच्या दृढनिश्चयाने आणि मेहनतीने एक असामान्य ओळख निर्माण केली आहे. आज ती भारतातील नामवंत फिटनेस ट्रेनर असून, बॉलिवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील अनेक सेलिब्रिटींना प्रशिक्षण देते. आंतरराष्ट्रीय बॉडीबिल्डिंग स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करीत तिने सहावा क्रमांक पटकावला आहे. तिचा हा प्रवास प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.

**गृहिणीपासून फिटनेस गुरूचा प्रवास**

लहानपणापासून किरणला शास्त्रीय संगीताची आवड होती. तिने संगीताचे धडे घेतले. लग्नानंतर पूर्णवेळ गृहिणी बनण्याचा निर्णय घेतला. दोन मुलांचा सांभाळ आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये ती इतकी गुंतली, की तिला स्वतःसाठी वेळच मिळत नसे. चाळीशीत तिला आरोग्याच्या समस्या जाणवू लागल्या. वजन ७४ किलो झाले आणि डॉक्टरांनी तिला तंदुरुस्तीची गरज असल्याचे सांगितले. यामुळे तिने आपल्या आरोग्याकडे लक्ष देण्याचे ठरविल. येथूनच तिच्या आयुष्यातील एका नव्या प्रवासाला सुरूवात झाली.

**फिटनेसचा निश्चय आणि यश**

२००३ मध्ये मुलगी आणि त्यानंतर मुलगा झाल्यावर किरणला शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागले. तिने जवळच्या जीममध्ये प्रवेश घेतला आणि हलक्या व्यायामापासून सुरूवात केली. जीममधील सहकाऱ्यांकडून प्रेरणा आणि आहार-व्यायामाविषयी माहिती मिळाल्याने तिचा आत्मविश्वास वाढला. अवघ्या एका वर्षात तिने २४ किलो वजन कमी केले आणि ‘ सिक्स पॅक ॲब्स ’ बनविले. लोकांचे कौतुक आणि प्रोत्साहन मिळाल्याने मला काहीतरी अनोखे करण्याची प्रेरणा मिळाली, असे किरण सांगते. तिने स्नायू पिळदार करण्यावर लक्ष केंद्रित केले आणि अथक परिश्रमाने हे ध्येय साध्य केले.



**आहार आणि व्यायामाचे रहस्य**

किरणच्या मते, प्रथिने आणि फायबरयुक्त आहार महत्त्वाचा आहे. मासे, पनीर, चिकन, अंडी, डाळी आणि हिरव्या पालेभाज्या यांचा आहारात समावेश असावा. काय खायचे, किती खायचे आणि काय टाळायचे याचे भान ठेवणे गरजेचे आहे, असे ती सांगते. ती दररोज एक ते दोन तास व्यायाम करते. ज्यामुळे तिची तंदुरुस्ती कायम राहाते.

**पुरस्कार आणि प्रेरणा**

२०१७ मध्ये तेलंगणा चेंबर इव्हेंट इंडस्ट्री कडून किरणला सर्वोत्कृष्ट डीजे पुरस्कार मिळाला. २०१९ मध्ये तेलंगणा महिला ब्रँड नेतृत्व पुरस्काराने तिला सन्मानित करण्यात आले. ‘ ठरवले तर कोणतीही स्त्री कोणत्याही वयात नवीन मार्ग निवडू शकते. स्वतःवर विश्वास आणि स्वतःशी संवाद ठेवला, की नकारात्मकता टाळून ध्येय साध्य होते,’ असा प्रेरणादायी संदेश ती सर्वांना, विशेषतः गृहिणींना देते.

**सेलिब्रिटी ट्रेनर ते आंतरराष्ट्रीय बॉडीबिल्डर**

**आज किरण देबला अनेक बॉलिवूड आणि दाक्षिणात्य सेलिब्रिटींना फिटनेस प्रशिक्षण देते. ‘बाहुबली’ दिग्दर्शक एस.एस. राजामौली, तमन्ना भाटिया, दीक्षा सेठ, प्रकाश राज, आणि अनुष्का शेट्टी यांसारख्या दिग्गजांना तिने मार्गदर्शन केले आहे. तिने स्वतःची फिटनेस अकॅडमी आणि जिम स्थापन केले आहे. शास्त्रीय गायिका म्हणूनही तिची स्वतंत्र ओळख आहे. ती अनेकदा मोटिव्हेशनल स्पीकर म्हणूनही आमंत्रित केली जाते.**

## साताऱ्यात ५०० वर्षांपूर्वीचा गुप्त बोगदा उघडकीस!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

साताऱ्यातील पायरी घाट रस्त्याचे चौपदरीकरण सुरू असताना खोदकामादरम्यान प्रचंड मोठा दगडी बोगदा सापडला. हा बोगदा भूमिगत बुरुज व एका प्राचीन किल्ल्याशी जोडलेला असल्याचे पुरातत्त्व विभागाचे प्राथमिक निरीक्षण आहे. बोगद्याच्या भिंतींवर प्राचीन शिलालेख, भित्तीचित्रे तसेच तांब्या-पितळीची शस्त्रे सापडली. गावात अशी चर्चा आहे, की शिवाजी महाराजांचा गुप्त मार्गच असेल का? पुरातत्त्व खात्याने ही जागा ताब्यात घेतली असून, सुरक्षारक्षक तैनात केले आहेत. दरम्यान, संशोधन पथकाने बोगदा ८ किलोमीटरपर्यंत विस्तारलेला असल्याचा अंदाज वर्तविला आहे.

# टूटी झोपड़ी, फटे कपड़े... औरंगजेब और बहादुरशाह जफर के वंशज कहां और कैसे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय इतिहास में कई साम्राज्यों का उदय और पतन हुआ, लेकिन उनके अवशेष आज भी स्मारकों और वंशजों के रूप में मौजूद हैं। राजस्थान के राजघरानों के शाही परिवार आज भी लोगों के बीच जाने जाते हैं, लेकिन मुगल वंशजों का क्या हुआ? उनकी कहानी चौंकाने वाली है।

कल्पना कीजिए कि आप भारत के अंतिम मुगल बादशाह की परपोती हैं, जो कभी वैभव और विलासिता से घिरी थीं, लेकिन अब कोलकाता के बाहरी इलाके में एक जर्जर झुग्गी बस्ती में रहती हैं। यह है ६० वर्षीय सुल्ताना बेगम की हकीकत, जो अंतिम मुगल शासक बहादुर शाह जफर की रिश्तेदार होने का दावा करती हैं। उनका शाही वंश अब एक धुंधली याद बनकर रह गया है।

## सुल्ताना बेगम का जीवन

सुल्ताना बेगम मिर्झा बेदार बुख्त की विधवा हैं, जिन्हें बहादुर शाह जफर द्वितीय का परपोती कहा जाता है। १९८० में मिर्झा बेदार की मृत्यु के बाद, सुल्ताना कोलकाता के पास हावड़ा में बस गईं। अब वह दो कमरों की एक छोटी झोपड़ी में अपनी अविवाहित बेटी मधु बेगम के साथ रहती हैं। उनकी दिनचर्या कठिनाइयों से भरी है।

- वे पड़ोसियों के साथ रसोई साझा करती हैं।
- कपड़े धोने और नहाने के लिए सार्वजनिक नल का उपयोग करती हैं।
- केंद्र सरकार से मिलने वाली ₹६,००० मासिक पेंशन पर गुजारा करती हैं, जो उनकी बुनियादी जरूरतें पूरी करने के लिए नाकाफी है।

## बहादुर शाह जफर से संबंध

सुल्ताना बेगम के ससुर बहादुर शाह जफर के परदादा थे। बहादुर शाह जफर १८३७ में मुगल साम्राज्य की गद्दी पर बैठे, जब साम्राज्य ब्रिटिश शासन के कारण अपनी शक्ति खो चुका था। १८५७ के भारतीय विद्रोह में वे प्रतीकात्मक नेता बने, लेकिन विद्रोह के दमन के बाद उन्हें रंगून (अब यांगून, म्यांमार) में निर्वासित कर दिया गया, जहां १८६२ में उनका निधन हुआ। सुल्ताना के पति मिर्जा बेदार बुख्त के पिता का जन्म १९२० में रंगून में हुआ था। उनके जन्म के समय उनके माता-पिता का निधन हो चुका था। ब्रिटिश सरकार ने उन्हें रंगून से बाहर जाने की अनुमति नहीं दी थी। उनके नाना ने उन्हें एक टोकरी में फूलों के नीचे छिपाकर पैदल जमशेदपुर लाया।

## आर्थिक संघर्ष और पेंशन

मिर्झा बेदार बुख्त को बहादुर शाह जफर के कानूनी उत्तराधिकारी के रूप में मान्यता प्राप्त थी, जिसके आधार पर उन्हें पेंशन मिलती थी। उनकी मृत्यु के बाद यह पेंशन सुल्ताना को मिली। सुल्ताना ने छोटे-मोटे व्यवसाय किए, जैसे चाय की दुकान चलाना और महिलाओं के कपड़े बेचना, लेकिन ये उनकी आर्थिक स्थिति सुधारने के लिए पर्याप्त नहीं थे।

## लाल किले पर दावा

सुल्ताना बेगम लंबे समय से बहादुर शाह जफर की संपत्ति, विशेष रूप से दिल्ली के लाल किले, पर कानूनी दावा करने की कोशिश कर रही हैं। उन्होंने कई याचिकाएं दायर कीं, लेकिन अधिकांश कानूनी तकनीकी कारणों, जैसे देरी, के आधार पर खारिज हो गईं। २०२१ में दिल्ली हाई कोर्ट ने उनकी याचिका को देर से दायर होने के कारण खारिज कर दिया। मई २०२५ में सुप्रीम कोर्ट ने भी उनके दावे को खारिज करते हुए टिप्पणी की, ‘ सिर्फ लाल किला ही क्यों? फतेहपुर सीकरी क्यों नहीं ’? सुल्ताना ने जवाब दिया, ‘ हमने लाल किला या फतेहपुर सीकरी नहीं मांगा। हमने तो बस बहादुर शाह जफर के हकदार निवास की मांग की थी ’। उन्होंने कहा कि सुप्रीम कोर्ट से उनकी आखिरी उम्मीद भी टूट गई है, और अब उनकी एकमात्र आस प्रधानमंत्री मोदी की सरकार से है।

## बार-बार खारिज हुईं याचिकाएं

औपनिवेशिक काल में अंग्रेजों और बाद में भारत सरकार द्वारा दी गई पेंशन के बावजूद, सुल्ताना की बुनियादी जरूरतें पूरी नहीं हो पाईं। उनकी याचिकाएं कानूनी बाधाओं के कारण बार-बार खारिज हुईं। वे न केवल आर्थिक सहायता, बल्कि अपनी शाही हैसियत और मुगल संपत्ति पर अधिकार के लिए कानूनी मान्यता चाहती हैं।

## सुल्ताना का दुख

सुल्ताना बेगम का कहना है, “ऐसा लगता है जैसे मेरे पैरों तले जमीन खिसक गई हो।” एक समय जो परिवार शाही वैभव का प्रतीक था, वह आज झुग्गी में जीवन बिता रहा है। उनकी कहानी मुगल साम्राज्य के पतन और उनके वंशजों की दयनीय स्थिति को दर्शाती है।



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# नाशिक येथून थेट पालघरला पोहोचता येणार

## इगतपुरी-वाढवण एक्स्प्रेसवेला मान्यता; औद्योगिक, शेतीला फायदा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नाशिक जिल्ह्याला पालघरमधील वाढवण बंदराशी जोडणाऱ्या महत्त्वाकांक्षी इगतपुरी-वाढवण एक्स्प्रेसवे तसेच 'फ्रेट कॉरिडॉर' महामार्ग प्रकल्पाला राज्य सरकारने तत्त्वतः मान्यता दिली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत या प्रकल्पांची अंमलबजावणी केली जाणार असून, वाढवण बंदर (तवा) ते समृद्धी महामार्गावरील भरवीर इंटरचेंजदरम्यान सुमारे १०४. ८९८ किमी लांबीच्या फ्रेट कॉरिडॉरला मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी २, ५२८. ९० कोटींच्या भूसंपादनासह विविध प्रशासकीय मंजुऱ्या देण्यात आल्या.

नाशिक-वाढवण एक्स्प्रेसवे आणि नाशिक-वाढवण रेल्वेमार्ग हे दोन महत्त्वाचे प्रकल्प एकमेकांच्या समन्वयाने राबवावेत, अशी मागणी भुजबळ यांनी यांनी २४ मार्च २०२५ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना व ६ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केली होती. श्री. भुजबळ यांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत, शासनाने मंत्रिमंडळ बैठकीनंतर वाढवण बंदर (तवा) ते भरवीर (समृद्धी महामार्ग) दरम्यान फ्रेट कॉरिडॉर महामार्गाला तत्त्वतः मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हा प्रकल्प हाती घेण्यात येईल. यासाठी अंदाजित १, ५०० कोटींचे भूसंपादन आणि १, ०२८. ९० कोटी संभाव्य व्याज असा एकूण २,५२८.९० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. शिवाय, हुडकोकडून घेतल्या जाणाऱ्या कर्जाच्या सुरक्षिततेसाठी राज्य शासनाने आवश्यक हमी देण्याचा निर्णयही घेतला आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे पुढील टप्पे यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी देखील पाठपुरावा करण्यात येईल असे मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

### औद्योगिक आणि शेतीला आंतरराष्ट्रीय फायदा

या निर्णयामुळे नाशिक जिल्हा, मराठवाडा, विदर्भ व इतर अंतर्गत भागातील औद्योगिक व शेती उत्पादनांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडणी अधिक सुलभ व किफायतशीर होईल. वाढवण बंदर हे भारतातील सर्वात खोल आणि आधुनिक सागरी टर्मिनलपैकी एक राहणार असून, 'आयएमईईसी' व 'आयएनएसटीसी'सारख्या आंतरराष्ट्रीय व्यापारमार्गांशी ते थेट जोडले जाणार आहे. या सगळ्याचा थेट फायदा महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक आणि पायाभूत विकासाला होणार आहे.



# प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात गांधी विचार शिबिर

**ग्लोबल वृत्तसेवा**

अमळनेर : महात्मा गांधी अध्ययन, संशोधन केंद्र, विचारधारा प्रशाळा, रासेयो विभाग व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे प्रताप तत्वज्ञान केंद्रात ४ आक्टोबर रोजी गांधी विचार शिबिर झाले. शहर व तालुक्यातील विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

विचारधारा प्रशाळा संचालक प्रा. डॉ. म. सु पगारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. व्ही. एम. रोकडे, प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, मानद संचालक डॉ. ओसवाल व प्रमुख वक्ते हनुमंत पवार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. हनुमंत पवार, डॉ. म. सु. पगारे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. महादेव तोडे, प्रा. डॉ. पारची, प्रा. विजयकुमार वाघमारे, धनराज राजपूत, प्रा. डॉ. अनिता खेडकर, डॉ. अस्मिता सबैया यांनी सहभाग घेतला. प्रताप महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी हेमंत पवार शिबिर समन्वयक होते. प्रा. मनोज इंगळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. दीपक खरात यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. रोकडे यांनी आभार मानले. प्रताप महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक, समाजकार्य महाविद्यालय, धनदाई महाविद्यालय, मारवड महाविद्यालयातील विद्यार्थी शिबिरात सहभागी झाले.



# फार्मासिस्ट दिनानिमित्त प्रा. रवींद्र माळींचा गौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त येथील प्रा. रवींद्र माळी यांना उत्कृष्ट कामाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. सोसायटी ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँण्ड रिसर्च संस्थेकडून १०१व्या आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये त्यांना गौरविण्यात आले.

प्रा. माठी यांच्या २७ वर्षांच्या फार्मसी क्षेत्रातील कार्य, प्रसिद्ध झालेली पुस्तके, संशोधन व माहितीपर शोधनिबंध, विविध राष्ट्रीय स्तरावरील शास्त्रीय सेमिनार मधील सहभाग लक्षात घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. प्रा. माळी हे नुकतेच श्री स्वामीनारायण विश्व मंगल गुरुकुल व स्वामी नारायण विद्यापीठाच्या (कलोल, जि. गांधीनगर, गुजरात) फार्मसी महाविद्यालयात सेवारत झाले आहेत. गुरुकुल व युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष स्वामी प्रेमस्वरूपदासजी, संत भक्त वत्सलजी, भक्ती नंदनजी, गुरुकुल मधील संत, युनिव्हर्सिटीचे कुलगुरु डॉ. रूपेश वसाणी, रजिस्ट्रार डॉ. अजित गंगावने आदींनी अभिनंदन केले आहे. अमळनेर येथील क्षत्रिय कांच माळी समाजाचे अध्यक्ष मनोहर महाजन व समाजबांधवांनी प्रा. माळी यांच्या यशाबद्दल कौतुक केले. अमळनेर येथील प्रसिद्ध बी- बियाणे व किटकनाशक औषध विक्रेते गंगाराम दोधू महाजन यांचे ते पूत्र आहेत.

# गृहरक्षक दलाच्या विविध प्रश्नांबाबत बच्चू कडू यांचे वेधले लक्ष!

## अनेक वर्षे प्रलंबित प्रश्नी आवाज उठवण्यासाठी घातले साकडे!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्रहार जनशक्ती पक्षाचे माजी आमदार बच्चू कडू यांचे गृहरक्षक दलाच्या जवानांनी विविध प्रश्नांबाबत बाबत लक्ष वेधले. रविवार, दि. ५ अमळनेर दौऱ्यावर श्री. बच्चू कडू आले होते. यावेळी त्यांना निवेदनही देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, की सर्व गृहरक्षक दलाच्या जवानांना ३६५ दिवस काम मिळावे. निष्काम सेवा हे ब्रीदवाक्य कालबाह्य झाले असून त्यात बदल करावा. होमगार्ड अधिनियम १९४७ यात बदल करावा. नवीन मसुदा तयार करून शासन निर्णय जारी करावा. गृहरक्षक दलात सलग पाच वर्षे सेवा बजावल्यानंतर जवानांना पोलिस, शिपाई, अमलदार या पदाकरिता थेट नियुक्ती मिळावी. राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे सोयीसुविधा व सवलती लागू कराव्यात. पोलिसांप्रमाणे समान काम समान वेतन मिळावे. निवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शनस्वरूपात दरमहा १५ हजार रुपये मिळावे. निवृत्तीचे वय ५८ वरून ६० करावे. यावेळी अमळनेर गृह रक्षक दलाचे राकेश चौधरी, गणेश लांडगे, जितेंद्र पवार, जितेंद्र महाजन, रामकृष्ण चौधरी, दत्तात्रय पाटील, भूषण शिंदे, वैष्णवी पाटील आदी उपस्थित होते.





अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234







# पंढरपूर येथे १५ नोव्हेंबरपासून 'व्हीओएम'चे राज्यस्तरीय अधिवेशन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या इंटरनॅशनल फोरमचे पंढरपूर येथे राज्यस्तरीय अधिवेशन होणार आहे. शनिवार, दि. १५ नोव्हेंबर व रविवार, दि. १६ नोव्हेंबरला श्री श्री राधा पंढरीनाथ मंदिर (इस्कॉन) येथे सकाळी ९ ते रात्री ११ असे दोन दिवस अधिवेशन होईल. या अधिवेशनासाठी इस्कॉनचे प्रल्हाददास महाराज, श्री.परमात्मा दास व श्री. शंकरदास महाराज यांचे सहकार्य लाभणार आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मान्यवरांसह महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकारी या अधिवेशनात सहभागी होतील. सुमारे अडीच हजार पत्रकारांचा यात सहभाग अपेक्षित आहे. विविध मान्यवरांच्या विशेष मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे. लोकशाहीचा आधारस्तंभ असलेली पत्रकारिता अधिक सक्षम आणि अबाधित कशी राहील, यावर या अधिवेशनात सखोल चर्चा होईल. अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पत्रकार आणि अनेक राजकीय मंडळींना या अधिवेशनासाठी खास निमंत्रित केले आहे, अशी माहिती संघटनेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी पंढरपूर येथे पत्रकार परिषदेत दिली.

# हॉटेल इंद्रभुवनचा स्वादिष्ट व दैदीप्यमान इतिहास...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील इंद्रभुवन हॉटेलच्या सर्व स्वादिष्ट पदार्थांना हॉटेलचे संचालक श्री. मनिष जोशी व संचालिका सौ. सोनल जोशी यांच्या सतत सहकार्यशील, आतित्यशिल व मधुर स्वभावाचा गोडवा लाभला आहे. श्री. मनिष जोशी हे लायन्स क्लबचे अध्यक्षही होते. लायन्स क्लबच्या माध्यमातून व वैयक्तिकरित्याही ते सर्वांना सर्वतोपरी सहकार्य करीत असतात.

सन १९१० मध्ये स्व. उमाशंकर जोशी हे भावनगर (गुजरात) येथून अमळनेर शहरामध्ये स्थायिक झाले. येथील गरजांच्या अभ्यास करून त्यांनी सुरुवातीस कडधान्य व दाळीचा व्यवसाय सुरु केला. या व्यवसायामुळे ते दालवाले महाराज म्हणून लोकप्रिय झाले. व्यवसायात यश मिळाल्यानंतर हॉटेल इंद्रभुवनच्या माध्यमातून हॉटेल व्यवसायास प्रारंभ केला. या हॉटेलमध्ये मिळणारे दर्जेदार, चविष्ट व रास्त दरात मिळणाऱ्या पदार्थामुळे अल्पावधीतच हॉटेल इंद्रदभुवन लोकप्रिय झाले. पुढे हॉटेलची धुरा स्व. वेणीशंकर जोशी यांनी समर्थपणे सांभाळली. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यातही सहभाग घेतला. त्यांना कुस्तीची खूप आवड होती. त्यामुळे त्यांनी त्या काळात अमळनेरमध्ये कुस्तीच्या मोठमोठ्या दंगली भरविल्या. त्या काळात त्यांनी दारासिंग व गामा पैलवान सारख्या दिग्गज पैलवानांना अमळनेरमध्ये बोलाविले होते. कुस्ती क्षेत्रातील त्यांच्या योगदानामुळे ते महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेचे उपाध्यक्ष झाले होते. आर्थिक परिस्थितीने गरीब असलेले अनेक पैलवानांना ते स्वखर्चाने खुराक पुरवित होते. त्यानंतर स्व. हसमुख जोशी यांनी हॉटेल व्यवसायाचे नावलौकिक आबाधीत ठेवले. त्यांना संगीताची खूप आवड होती. ते त्या काळातील सुप्रसिद्ध अकॉर्डियन व मेंडोलियन वादक होते. त्यांनी अमळनेर शहरात पहिला ऑर्केस्ट्रा तुरु केला होता. याशिवाय ते अमळनेर नगर पालिकेचे पहिले शॉप इन्स्पेक्टर होते. स्व. जगदीश वेणीशंकर जोशी यांनी व्यवसायाच्या दर्जावर विशेष भर दिला व काळाची पाऊले ओळखून त्यांनी पदार्थांमध्ये बदल केले व स्वादिष्टता वाढविली व इंद्रभुवन हॉटेल व्यवसायाला लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन पोचविले.

ततपश्चात, स्व. कन्हैयालाल जोशी यांनी इंद्रभुवनची लोकप्रियता अबाधित ठेवली. त्यांचा रक्तगट 'ओ' निगेटिव्ह होता. त्यांनी विक्रमी वेळा रक्तदान करुन मोठी सामाजिक बांधिलकी जपली. त्यामुळे अनेकांना जीवनदान मिळाले.

हॉटेल व्यवसायाची परंपरा पुढे चालवत अशोक वेणीशंकर जोशी आणि केतन हसमुख जोशी यांनी सुद्धा व्यवसाय वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. आता सुमारे १०५ वर्षांनंतर हॉटेल इंद्रभुवनमध्ये स्वादिष्टतेच्या तोच दर्जा जपत त्याला आम्ही पुन्हा नवीन व भव्य स्वरुप दिले आहे. जुन्या इंद्रभुवन हॉटेलच्या जागी आता आम्ही ग्राहकांना अधिक चांगली सेवा देता यावी यासाठी नवीन इमारत उभी केली आहे.

भजी, पोहे, स्पेशल मिसळ, रस्सा वडा, पाव वडा, फरसाण इत्यादी हे सर्व पूर्वीसारखे चविष्ट व दर्जेदार पदार्थ आहेतच. त्याबरोबर आता दिल्ली स्पेशल चाट-दहिवडा, पाणीपुरी, भेळ, पापडी चाट, राजकचोरी इत्यादी हे खास दिल्लीहून आलेले अनुभवी कारागिरांच्या हातून बनविलेली मिळेल. मुंबई स्पेशल पाव भाजी खास मुंबईहून बोलाविलेल्या कारागिरांच्या हातून बनविलेली मिळेल. चायनीजसाठी नेपाळचे कुशल कारागीर बोलाविले आहेत. यासोबत मावा मिठाई, ड्रायफ्रूट मिठाई, बंगाली मिठाई, पनीर इत्यादी मिळणार आहे.










# रामायणाचे रचनाकार अन् आद्यकवी : महर्षी वाल्मीक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महर्षी वाल्मिकी जयंती ही दरवर्षी आश्विन पौर्णिमेस साजरी करण्यात येते. भारतीय संस्कृती आणि साहित्यातील एका महान व्यक्तिमत्त्वाला स्मरण करण्याची जणू ही संधी आहे. महर्षी वाल्मिकी यांना आदिकवी म्हणून ओळखले जाते. त्यांनी विश्वविख्यात ‘ रामायण ’ या महाकाव्याची रचना केली. त्यांचा जीवनप्रवास, त्यांचे साहित्यिक योगदान आणि आध्यात्मिक प्रेरणा आजही लाखो लोकांना मार्गदर्शन करते. यंदा ७ ऑक्टोबर २०२५ रोजी साजऱ्या होणाऱ्या महर्षी वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा घेतलेला आढावा.



**महर्षी वाल्मिकी यांचा जीवनप्रवास :**
दस्यूपासून महर्षीपदापर्यंत महर्षी वाल्मिकी यांचा जन्म आणि त्यांचे प्रारंभिक जीवन रहस्यमय आहे. परंतु त्यांच्याबद्दलच्या कथा अतिशय प्रेरणादायी आहेत. असे मानले जाते, की वाल्मिकी यांचे मूळ नाव रत्नाकर होते. ते प्रारंभी दस्यू (डाकू) होते. एकदा त्यांची भेट नारदमुनींशी झाली. नारदांनी त्यांना प्रश्न विचारला, की तू हे पापकर्म का करीत आहेस? तुझ्या कुटुंबीयांचा यात हिस्सा आहे का? त्यावर रत्नाकर यांनी आपल्या कुटुंबीयांना विचारले असता त्यांना कुणीही साथ देण्यास नकार दिला. हा अनुभव रत्नाकर यांच्या जीवनाला कलाटणी देणारा ठरला.
नारदमुनींच्या सल्ल्याने रत्नाकर यांनी ‘ राम ’ नावाचा जप सुरू केला. परंतु पापी जीवनामुळे ते ‘ राम ’ उच्चारू शकत नव्हते. त्यांनी ‘ मरा-मरा ’ असा जप केला. जो उलट उच्चारला तरी ‘ राम ’च बनत होता. वर्षानुवर्षे तपश्चर्येत मग्न राहिल्याने त्यांचे शरीर वाल्मिकीने (मुंग्यांनी) झाकले गेले आणि त्यांना ‘ वाल्मिकी ’ हे नाव मिळाले. याच तपश्चर्येने त्यांना दस्यूपासून महर्षीपदापर्यंत नेऊन आध्यात्मिक उन्नती दिली.

**रामायणाची रचना :** आदिकाव्याचा जन्म
महर्षी वाल्मिकी यांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे ‘ रामायण ’ हे महाकाव्य. असे मानले जाते, की एकदा महर्षी वाल्मिकींनी एका व्याधाने क्रौंच पक्ष्याच्या जोडीतील एका पक्ष्याला मारलेले पाहिले. या घटनेने व्यथित होऊन त्यांच्या तोंडून श्लोक बाहेर पडला.
मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीं समाः ।
यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥
हा श्लोक संस्कृत साहित्यातील पहिला श्लोक मानला जातो. ज्यामुळे महर्षी वाल्मिकींना ‘ आदिकवी ’ ही पदवी मिळाली. पुढे नारदमुनींनी प्रभू श्रीरामचंद्र यांचे चरित्र सांगितल्यानंतर आणि ब्रह्मदेव यांच्या प्रेरणेने वाल्मिकींनी रामायणाची रचना केली. हे महाकाव्य २४ हजार श्लोकांचे आहे. सात कांडांमध्ये विभागले गेले आहे. यात मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांचे जीवन, त्यांचे आदर्श, धर्म, कर्तव्य आणि मानवीमूल्यांचे दर्शन घडते.

**महर्षी वाल्मिकींचे तत्त्वज्ञान आणि प्रेरणा**
रामायण हे केवळ एक साहित्यिक काव्य नसून जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. महर्षी वाल्मिकींनी प्रभू श्रीरामांच्या जीवनातून सत्य, धर्म, त्याग, प्रेम आणि कर्तव्यनिष्ठा यांचे महत्त्व अधोरेखित केले. रामायणातून माणसाला आपल्या कर्तव्यातून आणि नैतिकतेतून कधीही ढळू नये, असा संदेश मिळतो. महर्षी वाल्मिकींनी सीता मातेला आश्रय देऊन स्त्रीशक्तीचा सन्मान केला आणि लव-कुश यांना शिक्षण देऊन गुरु-शिष्य परंपरेला मजबूत केले.

**आजच्या काळातील प्रासंगिकता**
महर्षी वाल्मिकींचा जीवनप्रवास आपल्याला शिकवितो, की कितीही अंधकारमय भूतकाळ असला, तरी प्रामाणिक प्रयत्न आणि तपश्चर्येने माणूस स्वतःला बदलू शकतो. रामायणातील आदर्श आजही आपल्याला नीतिमत्ता, कर्तव्य आणि मानवतेची प्रेरणा देतात. डिजिटल युगातही रामायणाचे पठण, चर्चा आणि त्यातील मूल्यांचा प्रसार सोशल मीडियाद्वारे होत आहे. ज्यामुळे महर्षी वाल्मिकींचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहेत. महर्षी वाल्मिकी जयंती हा आपल्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचा उत्सव आहे. महर्षी वाल्मिकींच्या जीवनातील परिवर्तन आणि त्यांच्या रामायणाने दिलेला संदेश आजही समाजाला दिशा दाखवतो. या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी त्यांची शिकवण आत्मसात करून सत्य, धर्म आणि कर्तव्याच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. आदिकवी महर्षी वाल्मिकी यांना कोटी-कोटी प्रणाम...!

### महर्षी वाल्मिकी जयंतीचे सांस्कृतिक महत्त्व

महर्षी वाल्मिकी जयंती हा केवळ धार्मिक उत्सव नसून, साहित्य, संस्कृती आणि आध्यात्मिकतेचा संगम आहे. या दिवशी देशभरात महर्षी वाल्मिकी मंदिरांमध्ये विशेष पूजा, रामायण पठण आणि भजन-कीर्तन आयोजित केले जाते. विशेषतः पंजाब, हरियाणा आणि उत्तर भारतात हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. महर्षी वाल्मिकी समाज या दिवशी आपल्या आद्य गुरूंच्या स्मृतीला उजाळा देतो. त्यांच्या शिकवणुकीचे पालन करण्याचा संकल्प करतो.

## कोणत्या देवाला किती प्रदक्षिणा घालाव्यात?

भैरवीजी- ०३ परिक्रमा, शनी देव- ०७, हनुमानजी- ०३, श्री गणेश- ०३, पिंपळाचे झाड- ०७, भगवान श्रीकृष्ण- ०४, भगवान विष्णू- ०४, भगवान श्रीराम- ०४, दुर्गा माता- ०१, शिवजी- अर्धी परिक्रमा (फक्त डाव्या बाजूने)



# विड्याची पाने शुभ कार्यात महत्त्वाची का मानली जातात ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरात कोणतीही पूजा असो साखरपुडा किंवा लग्न या सारखे शुभकार्य असेल तर अनेकदा गुरुजी /भटजी पहिला प्रश्न विचारतात विड्याची पाने आणलीत का ? या विड्याच्या पानांना केवळ महाराष्ट्रातील लोकांमध्येच नाही तर इतर धर्मांतील लोकांमध्ये विड्याच्या पानांना फार महत्व आहे. बंगाली लोकांमध्ये लग्नाला नवरीच्या तोंडासमोर विड्याची पाने घेऊन मंडपात आणले जाते. तेलगु, बिहारी, पंजाबी या सर्व धर्मांमध्ये विड्याचे पान आणि सुपारी देऊन लग्नाची बोलणी करतात किंवा शुभकार्याला सुरुवात करतात. मात्र आपल्यापैकी कित्येकांना ही विड्याची पाने का वापरली जातात असे विचारले तर कोणी ही त्याचे उत्तर ठामपणे सांगू शकणार नाही. विड्याच्या पानामागची धार्मिक कहाणी समुद्रमंथन करीत असतांना त्यातून अमृत निघाल्यावर भगवान विष्णूंनी मोहिनी रूप धारण करून अमृताचे वाटप केले. ते करतांना त्यात थोडे अमृत शिल्लक राहिले. त्यावेळी मोहिनी रूप धारण केलेल्या विष्णूंनी उरलेले अमृत जवळच उभ्या असलेल्या नागराज नावांच्या हत्ती ला बांधलेल्या खुंटाजवळ नेऊन ठेवले. काही दिवसांनी त्या अमृतामधून एक वेल उगवली ही वेल नागाप्रमाणे हत्ती जवळील खुंटावरून सरसर चढत जवळ च असलेल्या मंडपावर पसरली. ती हिरवीगार पाने असलेली वेल पाहून देवांना आनंद झाला. त्यांनी त्या वेलीला नागवेल म्हणून नाव दिले. जेवण झाल्यावर देव आणि देवता या पानाचा विडा आवडीने खाऊ लागले. त्यानंतर देवाला महानैवैद्य अर्पण केल्यावर देवापुढे पानाचा विडा, दक्षिणा ठेवण्यात येऊ लागली.



**विड्याच्या पानाचे महत्व काय ?**
अशी मान्यता आहे, की विड्याच्या पानाच्या टोकास “ लक्ष्मी “ चा सहवास असतो. विडयाच्या पानाच्या उजव्या बाजूस “ ब्रम्हदेवांचा “ सहवास असतो. या विडयाच्या पानाच्या मधोमध “ सरस्वती देवी चा” वास असतो. विडयाच्या पानाच्या डाव्या बाजूस पार्वतीदेवीचा वास असतो. विडयाच्या पानाच्या शेवटच्या लहान टोका मध्ये “ महाविष्णूचा “ वास असतो. विडयाच्या पानाच्या मागील बाजूस “ चंद्रदेवते “चा वास असतो. विडयाच्या पानाच्या सर्व कोपऱ्यामध्ये “ परमेश्वरा “ चा वास असतो. विडयाच्या पाना खाली “ मृत्यूदेवते “चा वास असतो. त्यामुळे विडा अथवा तांबूल खातांना बुडाचा भाग काढून मगच सेवन करण्याची पद्धत आहे.विडयाच्या पानाच्या देठात ‘ अहंकार देवता’ आणि ‘ दारिद्र्य लक्ष्मी’ राहतात. म्हणून पान सेवन करतांना देठ काढून टाकायचे असतात. श्री स्वामी समर्थ महाराज की जय हो ...!

## आश्विन शुक्ल द्वादशी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अखंड द्वादशी**
**व्रत विधी**
१) आश्विन शुक्ल एकादशीला उपवास करावा.
२) द्वादशीला भगवान विष्णू यांची विधिवत पूजा करावी.
३) व्रताचा कालावधी एक वर्ष आहे.
फल : धर्मकृत्यांतील न्यूनता पूर्ण होते, अशी मान्यता आहे.

**अशोका द्वादशी**
व्रत विधी
१) आश्विन शुक्ल दशमीपासून व्रताचा प्रारंभ करावा.
२) दशमीला भगवान केशव यांची पूजा करून अल्पोपहार घ्यावा.
३) एकादशीला उपवास करावा.
४) द्वादशीला पारणा करून व्रताची समाप्ती करावी.
५) व्रताचा कालावधी एक वर्ष आहे.
फल : आरोग्यलाभ आणि शोकमुक्ती, अशी मान्यता आहे.

**कौमुदी**



**व्रत**
व्रत विधी
१) आश्विन शुक्ल द्वादशीला व्रताचा प्रारंभ करावा.
२) द्वादशीला कमळाच्या फुलांनी भगवान विष्णू यांची पूजा करावी.
३) त्रयोदशीला वैष्णवक्षेत्राला यात्रा करावी.
४) चतुर्दशीला उपवास आणि जागरण करावे.
५) पौर्णिमेला भगवान विष्णू यांची पूजा करावी आणि खालील मंत्रांचा जप करावा.
ॐ नमो नारायणाय
ॐ नमो वासुदेवाय
फल : वैकुंठप्राप्ती, अशी मान्यता आहे.

# आई भगवतीची ५१ शक्तीपीठे



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देवीभागवत पुराणात १०८ शक्तीपीठांचा उल्लेख येतो, तर देवीगीतेत ७२ शक्तीपीठांची माहिती मिळते. ‘तंत्रचूडामणी’ मध्ये ५२ शक्तीपीठे सांगितली आहेत,
पण देवीपुराणामध्ये केवळ ५१ शक्तीपीठांचीच चर्चा आहे. या ५१ शक्तीपीठांपैकी काही परदेशात आहेत आणि तिथेही पूजाअर्चा व प्रतिष्ठा आहे. भारताच्या फाळणीनंतर यापैकी ५ शक्तीपीठे भारताबाहेर गेली.

**आज भारतात ४२ शक्तीपीठे आहेत.**
१ पाकिस्तानमध्ये, ४ बांगलादेशमध्ये, तर उर्वरित ४ शक्तीपीठे
१ श्रीलंकेत, १ तिबेटमध्ये, २ नेपाळमध्ये आहेत.

**॥ या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ॥**

**शक्तीपीठांची उत्पत्तीची कथा :** राजा प्रजापती दक्ष यांची कन्या सतीने भगवान शंकराशी विवाह केला होता. दक्षाला शंकराबद्दल अजिबात आदर नव्हता. कनखल (हरिद्वार) येथे केलेल्या भव्य यज्ञात दक्षाने जाणीवपूर्वक शंकराला आमंत्रण दिले नाही. नारदांनी ही गोष्ट सतीला सांगितली. शंकरांनी जाण्यास मनाई केली तरी सती हट्टाने गेली.यज्ञस्थळी दक्षाने भगवान शंकरांचा अपमान केला. हे सहन न होऊन सतीने यज्ञकुंडात उडी घेऊन प्राणत्याग केला. हे कळताच शंकरांनी तिसरे नेत्र उघडले आणि सर्वत्र प्रलय माजला. वीरभद्राने दक्षाचे मस्तक छाटले. शंकरांनी सतीचे पार्थिव शरीर खांद्यावर घेतले आणि उन्मत्त तांडव सुरू केले. पृथ्वी हादरू लागली. तेव्हा भगवान विष्णूंनी सुदर्शन चक्राने सतीचे शरीर तुकडे केले. ज्या-ज्या स्थळी सतीचे अवयव, अलंकार किंवा वस्त्राचे तुकडे पडले, तिथे तिथे शक्तीपीठे उदयास आली. एकूण ५१ स्थळे शक्तीपीठे म्हणून ओळखली जातात. नंतरच्या जन्मात सतीने हिमवानाच्या घरी पार्वती म्हणून जन्म घेतला आणि घोर तपश्चर्येने पुन्हा शंकराला पतीरूपाने प्राप्त केले.

### ५१ शक्तीपीठांचे विवेचन :

(येथे प्रत्येक शक्तीपीठाचे ठिकाण, सतीचा पडलेला अवयव, तेथील देवी व भैरव अशी माहिती दिलेली आहे)

**किरीट शक्तीपीठ (प. बंगाल, हुगळी) :** सतीचा मुकुट येथे पडला. देवी विमला/भुवनेश्वरी, भैरव संवर्त.
**कात्यायनी शक्तीपीठ (वृंदावन, मथुरा) :** सतीचे केशपाश पडले. देवी कात्यायनी.
**करवीर शक्तीपीठ (कोल्हापूर, महाराष्ट्र) :** सतीचे त्रिनेत्र पडले. देवी महिषासुरमर्दिनी, भैरव क्रोधशिष. येथे महालक्ष्मीचे निजनिवास मानले जाते.
**श्रीपर्वत शक्तीपीठ (लद्दाख/सिलहट) :** सतीची कनपटी पडली. देवी श्रीसुंदरी, भैरव सुंदरानंद.
**विशालाक्षी शक्तीपीठ (काशी, उत्तर प्रदेश) :** सतीच्या कानातील मणी पडले. देवी विशालाक्षी, भैरव कालभैरव.
**गोदावरी तट शक्तीपीठ (कब्बूर, आंध्र) :** सतीचा डावा गाल पडला. देवी विश्वेश्वरी, भैरव दंडपाणी.
**शुचिंद्रम शक्तीपीठ (कन्याकुमारी, तामिळनाडू) :** सतीचे वरचे दात पडले. देवी नारायणी, भैरव संहार.
**पंचसागर शक्तीपीठ (स्थान अज्ञात) :** सतीचे खालचे दात पडले. देवी वाराही, भैरव महारुद्र.
**ज्वालामुखी शक्तीपीठ (कांगडा, हिमाचल) :** सतीची जीभ पडली. देवी सिद्धिदा, भैरव उन्मत्त.
**भैरव पर्वत शक्तीपीठ (गिरनार/उज्जैन) :** सतीचा वरचा ओठ पडला. देवी अवंती, भैरव लंबकर्ण.
**अट्टहास शक्तीपीठ (लाबपूर, प. बंगाल) :** सतीचा खालचा ओठ पडला. देवी पफुल्लरा, भैरव विश्वेश.
**जनस्थान शक्तीपीठ (नाशिक, महाराष्ट्र) :** सतीची हनुवटी पडली. देवी भ्रामरी, भैरव विकृताक्ष.
**कश्मीर शक्तीपीठ (अमरनाथ) :** सतीचा कंठ पडला. देवी महामाया, भैरव त्रिसंध्येश्वर.
**नंदिपुर शक्तीपीठ (सैन्थया, प. बंगाल) :** सतीचा कंठहार पडला. देवी निंदनी, भैरव निंदकेश्वर.
**श्रीशैल शक्तीपीठ (कुर्नूल, आंध्र) :** सतीची मान पडली. देवी महालक्ष्मी, भैरव ईश्वरानंद.
**नलहरी शक्तीपीठ (बोलपूर, प. बंगाल) :** सतीची उदरनळी पडली. देवी कालिका, भैरव योगीश.
**मिथिला शक्तीपीठ (जनकपूर/समस्तीपूर/सहरसा) :** सतीचा डावा खांदा पडला. देवी उमा, भैरव महोदर.
**रत्नावली शक्तीपीठ (चेन्नई परिसर) :** सतीचा उजवा खांदा पडला. देवी कुमारी, भैरव शिव.
**अंबाजी/प्रभास पीठ (गुजरात, गिरनार) :** सतीचे उदर पडले. देवी चंद्रभागा, भैरव वक्रतुण्ड.
**जालंधर शक्तीपीठ (पंजाब) :** सतीचा डावा स्तन पडला. देवी त्रिपुरमालिनी, भैरव भीषण.
**रामगढी शक्तीपीठ (चित्रकूट/मैहर) :** सतीचा उजवा स्तन पडला. देवी शिवानी, भैरव चंड.
**वैद्यनाथ हृदय शक्तीपीठ (देवघर, झारखंड) :** सतीचे हृदय पडले. देवी जयदुर्गा, भैरव वैद्यनाथ.
**वक्त्रोश्वर शक्तीपीठ (सैन्थया, प. बंगाल) :** सतीची मान पडली. देवी महिषासुरमर्दिनी, भैरव वक्त्रनाथ
**कन्याकुमारी शक्तीपीठ (तामिळनाडू) :** सतीचा पाठ/दात पडला. देवी शर्वाणी, भैरव स्थाणु.
**बहुला शक्तीपीठ (केतुग्राम, प. बंगाल) :** सतीचा डावा हात पडला. देवी बहुला, भैरव भीरुक.
**उज्जयिनी शक्तीपीठ (उज्जैन, मध्यप्रदेश) :** सतीची कोपर पडली. देवी मंगळचंडीका, भैरव मंगल्यकपिलांबर.
**मणिवेदिका शक्तीपीठ (पुष्कर, राजस्थान) :** सतीच्या मनगट्या पडल्या. देवी गायत्री, भैरव शर्वानंद.
**प्रयाग शक्तीपीठ (इलाहाबाद, उत्तर प्रदेश) :** सतीची बोटे पडली. देवी ललिता.
**उत्कल शक्तीपीठ (पुरी/याजपुर, ओडिशा) :** सतीची नाभी पडली. देवी विमला, भैरव जगन्नाथ.
**कांची शक्तीपीठ (कांचीपुरम्, तामिळनाडू) :** सतीचे अस्थी पडले. देवी देवगर्भा, भैरव रुरु.
**कालमाध्व शक्तीपीठ (स्थान अज्ञात) :** सतीचा डावा नितंब पडला. देवी काली, भैरव असितांग.
**शोण शक्तीपीठ (अमरकंटक/सासाराम) :** सतीचा उजवा नितंब वा डोळा पडला. देवी नर्मदा, भैरव भद्रसेन.
**कामरूप कामाख्या शक्तीपीठ (गुवाहाटी, आसाम) :** सतीची योनी पडली. देवी कामाख्या, भैरव उमानंद.
जयन्ती शक्तीपीठ (मेघालय) : सतीची डावी जांघ पडली. देवी जयन्ती, भैरव क्रमदीश्वर.
मगध शक्तीपीठ (पटना, बिहार) : सतीची उजवी जांघ पडली. देवी सर्वानंदकरी, भैरव व्योमकेश.
**त्रिस्तोता शक्तीपीठ (जालपाईगुडी, प. बंगाल) :** सतीचा डावा पाय पडला. देवी भ्रामरी, भैरव ईश्वर.
**त्रिपुरी सुंदरी शक्तीपीठ (त्रिपुरा) :** सतीचा उजवा पाय पडला. देवी त्रिपुरीसुंदरी, भैरव त्रिपुरेश.
**विभाष शक्तीपीठ (मिदनापूर, प. बंगाल) :** सतीचा डावा घोटा पडला. देवी कापालिनी, भैरव सर्वानंद.
**कुरुक्षेत्र शक्तीपीठ (हरियाणा) :** सतीचा उजवा पाय पडला. देवी सावित्री, भैरव स्थाण
**युगाद्या/क्षीरग्राम शक्तीपीठ (बर्दमान, प. बंगाल) :**
सतीच्या पायाचा अंगठा पडला.
**विराट शक्तीपीठ (जयपूर, राजस्थान) :** सतीच्या उजव्या पायाची बोटे पडली. देवी अंबिका, भैरव अमृत.
**कालीघाट शक्तीपीठ (कोलकाता, प. बंगाल) :** सतीच्या पायाच्या चार बोटे पडली. देवी कालिका, भैरव नकुलेश.
**मानस शक्तीपीठ (मानसरोवर, तिबेट) :** सतीचा उजवा तळहात पडला. देवी दाक्षायणी, भैरव अमर.
**लंका शक्तीपीठ (श्रीलंका) :** सतीचा नूपुर पडला. देवी इंद्राक्षी, भैरव राक्षसेश्वर.
**गंडकी शक्तीपीठ (नेपाळ) :** सतीचा उजवा गाल पडला. देवी गंडकी, भैरव चक्रपाणी.
**गुह्येश्वरी शक्तीपीठ (काठमांडू, नेपाळ) :** सतीची दोन्ही गुडघे पडले. देवी महामाया, भैरव कपाल.
**हिंगलाज शक्तीपीठ (बलुचिस्तान, पाकिस्तान) :**
*सतीचा ब्रह्मरंध्र पडला.
**सुगंध शक्तीपीठ (खुलना, बांगलादेश) :** सतीचे नाक पडले. देवी सुनंदा, भैरव त्र्यंबक.
**करतोया घाट शक्तीपीठ(बांगलादेश) :** सतीची डावी कनपटी पडली. देवी अपर्णा, भैरव वामन.
**चट्टल शक्तीपीठ (चटगाव, बांगलादेश) :** सतीचा उजवा हात पडला. देवी भवानी, भैरव चंद्रशेखर.
**यशोरेश्वरी शक्तीपीठ (जेसोर, बांगलादेश) :** सतीचा डावा तळहात पडला. देवी यशोरेश्वरी, भैरव चंद